शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांच्या
पडताळणी अहवालावर
मा. मंत्रीमंडळाने घेतलेल्या
निर्णयानुसार केलेला फेरतपासणी
अहवाल.....

ग्रंथालय संचालनालय
म. राज्य, मुंबई
आवक क्रमांक 908
दिनांक 7/6/2014
कार्या. 3

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्रशिक्षण विभाग**
शासन निर्णय क्र. मराग्रं -२०१२/प्र.क्र.२५३/२०१३/साशि-५,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२,
दिनांक : ७जून, २०१४.

वाचा : १) शासन निर्णय, क्र. एलआयबी १०९६/७५/(८०)साशि-५, दिनांक २२ जानेवारी १९९८
२) शासन निर्णय, क्र. मराग्रं १००१/ (४१२) साशि-५, दिनांक १ ऑगस्ट २००२
३) शासन निर्णय, क्र. मराग्रं १००३/२२९/(११३/०३)साशि-५, दिनांक १३ मे. २००४
४) शासन निर्णय क्र. मराग्रं १००४/(१२६/०४)साशि-५, दिनांक ९ मार्च, २००५
५) शासन निर्णय क्र. मराग्रं २००९/प्र.क्र.२३६/साशि-५, दिनांक २१ फेब्रुवारी, २०१२
६) शासन निर्णय क्र. मराग्रं -२०१२/प्र.क्र.२५६/साशि-५, दिनांक.२२.०३.२०१३

प्र. संचालक
07/06/2014
कार्या-3.
प्र.स.ग्रं.स.

**प्रस्तावना** : महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये अधिनियम, १९६७ अंतर्गत तरतुदीनुसार करण्यात आलेल्या महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये (सहाय्यक अनुदान आणि इमारत व साधनसामग्री यासाठी मान्यता) नियम, १९७० मधील तरतुदींनुसार, स्वतंत्र नोंदणीकृत सार्वजनिक ग्रंथालयांना शासनमान्यता व सहाय्यक अनुदान मंजूर करण्यात येते.

दि.२८.१२.२०११ रोजी झालेल्या मंत्रीमंडळाच्या बैठकीतील निर्णयानुसार, शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांना अनुज्ञेय असलेल्या परिरक्षण अनुदानात दि.०१.०४.२०१२ पासून, विद्यमान दराच्या ५०% वाढ करण्याचा शासन निर्णय उपरोक्त संदर्भ क्र.५ अन्वये निर्गमित करण्यात आला. त्यामध्ये सर्व शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांची सर्वंकष पडताळणी, महसूल यंत्रणेकडून करण्यात यावी व त्याबाबतचा अहवाल मंत्रिमंडळासमोर सादर करावा आणि तोपर्यंत कोणत्याही नवीन ग्रंथालयांना मान्यता, दर्जोन्नती व वाढीव ५०% अनुदान देण्यात येऊ नये, असे मंत्रीमंडळाच्या निर्णयानुसार नमूद करण्यात आले आहे.

त्यास अनुसरुन मा.मुख्य सचिवांच्या दिनांक २०.०४.२०१२ च्या अर्धशासकीय पत्रान्वये राज्यातील सर्व शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांची पडताळणी दि. २१ मे, २०१२ ते २५ मे, २०१२ या कालावधीत महसूल यंत्रणेकडून करण्यात आली. ३१ मार्च २०१२ अखेर असणाऱ्या १२८६१ ग्रंथालयांपैकी महसूल यंत्रणेकडून प्राप्त झालेल्या १२८४६ ग्रंथालयांच्या पडताळणीचा अहवाल दिनांक ६.३.२०१३ रोजी मंत्रीमंडळाच्या मान्यतेस्तव सादर करण्यात आला होता. सदर बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयाबाबतचा शासन निर्णय संदर्भ क्र.६

अन्वये निर्गमित करण्यात आला आहे. सदर शासन निर्णयानुसार करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल दि.०२.०६.२०१४ रोजी मंत्रिमंडळास सादर करण्यात आला होता. त्यांबाबत मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय** :-

मा. मंत्रीमंडळाच्या दिनांक ६.३.२०१३ रोजी झालेल्या बैठकीमध्ये घेतलेल्या निर्णयानुसार करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल दि.२.६.२०१४ रोजी झालेल्या मा. मंत्रीमंडळाच्या बैठकीत सादर करण्यात आला होता. सदर अहवालाच्या अनुषंगाने दि. २.६.२०१४ रोजी मा. मंत्रीमंडळाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

१) महसूल विभागाच्या पडताळणी अहवालात त्रुटी आढळून आलेली ५७८८ ग्रंथालये तद्नंतर महसूल विभागाने पडताळणी केलेली ४ ग्रंथालये व ग्रंथालय संचालक यांनी तपासणी केलेली ११ ग्रंथालये अशा एकूण ५८०३ ग्रंथालयांची तपासणी केली असता ५७०१ ग्रंथालयांनी त्रुटींची पूर्तता केली असल्याचे दिसून आले. ८३ ग्रंथालयांनी त्रुटींची पूर्तता केली नसल्याने त्यांची विहित पध्दतीने मान्यता रद्द करण्यात आली. व १९ ग्रंथालयांना दर्जावनत करण्यात आले आहे. त्यामुळे फेरतपासणीमध्ये कार्यरत आढळलेल्या ५७०१ ग्रंथालयांना नियमानुसार असलेली ५०% वाढ लागू करावी.

२) राज्यातील सर्व शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालये ई-लायब्ररीमध्ये रुपांतरीत करण्यात यावीत.

३) यापुढे नवीन ग्रंथालयांना मान्यता देण्यात येवू नये.

हे आदेश तात्काळ अंमलात येतील. याबाबतची पुढील कार्यवाही प्र.ग्रंथालय संचालकांनी करावी.

हे आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक 201406071438226008 असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

( शैला तारगे-पाटील )
सहसचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा ) मुंबई/नागपूर
अधिदान व लेखा अधिकारी,मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
सर्व विधानसभा/विधानपरिषद सदस्य

F:\मंत्रीमंडळ टिप्पणी 5.6.2014.docx

मा.राज्यपालांचे सचिव,
मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
मा.उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
सर्व मंत्री आणि राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक,
मा.मुख्यसचिव यांचे स्वीय सहायक
प्र.ग्रंथालय संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सर्व जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, }
मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व जिल्हा परिषदा, } (ग्रंथालय
सर्व सहाय्यक ग्रंथालय संचालक/ ग्रंथपाल, सर्व शासकीय विभागीय ग्रंथालये/ } संचालनालयामार्फत)
ग्रंथपाल, सर्व शासकीय जिल्हा ग्रंथालये, }
अध्यक्ष, सर्व राज्य, विभाग व जिल्हा ग्रंथालय संघ, }
मुख्य लेखा परीक्षा, स्थानिक निधी लेखा, मुंबई
सर्व जिल्हा कोषाधिकारी / उप कोषागार, नवी मुंबई
वित्त विभाग (व्यय-५) (अर्थसंकल्प-३)/ नियोजन विभाग (१४२३/१४७१)
ग्राम विकास व जलसंधारण विभाग
जनसंपर्क अधिकारी, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई